# उल्हासनगर महानगरपालिका

## प्रस्तावना

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूचीतील प्रकरण ८ मधील नियम २० अन्वये उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील इमारती व जमीनी यावरील कर निर्धारणा विरुध्द संबंधित व्यक्तीने अभिवेदन केल्यावर आकारणी पुस्तकांत सुधारणा करण्याचे तरतुदीप्रमाणे श्री. उत्तम फकिरा सगळे यांनी उल्हासनगर महापालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्रमांक ४०सीओ०१२३५६६०० व मालमत्ता क्र. ४०सीओ००९०१५२०० चे कर आकारणी विरुध्द खालील बाबींबाबत हरकत दाखल केली आहे.

**उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता ४०सीओ००९०१५२०० रदद करुन त्यापोटी आकारण्यात आलेला मालमत्ता कर रुपये १,२४,९२६/- + विलंब शास्ती निर्लेखित करावी.**

अ) दुबार कर नोंदणी व इतर कारणास्त्व असलेल्या मालमत्ताची नोंद निर्लेखित करण्याविषयी गठित समितीपुढे मालमत्ता क्र. ४०सीओ०१२३५६६०० अन्वये नोंद असलेल्या एकाच मालमत्तेची मालमत्ता क्र. ४०सीओ००९०१५२००अन्वये झालेली दुबार नोंद रदद करुन आजमितीस त्यावरील वसूल न होण्याजोगे कर रक्क्कम रु. १२४९२६/- + विलंब शास्ती निर्लेखित करणे करिता शिफारस करण्यात आली होती.

ब) समितीने प्रकरण निहाय तपासणी केली असता दुबार मिळकतीबाबत प्रत्यक्ष जागेवरील पंचनामा दि. ०३/०७/२०२३ व २१/१२/२०२३ नुसार मिळकतधारक यांचेसमवेत प्रत्यक्ष जागेवर केलेल्या पंचनाम्यानुसार मालमत्ता क्रमांक ४०सीओ०१२३५६६०० कायम ठेवून मालमत्ता क्र. ४०सीओ००९०१५२०० ही दुबार मिळकत रदद करण्यात यावी असा अभिप्राय देण्यात आलेला आहे.

क) सदयस्थितीत मालमत्ता कराच्या सन २०२२-२३ च्या देयकानुसार सदर मालमत्तेचे क्षेत्रफळ १९८ चौ. फु. दिसून येत आहे. दुबार मालमत्ता क्र. ४०सीओ००९०१५२०० ही रदद होवून नवीन ३४९.८१ क्षेत्रफळ असणारी मालमत्ता ४०सीओ०१२३५६६०० पुर्नकर निर्धारण करुन वाढीव क्षेत्रफळ हे अधिकृत आहे किंवा अनधिकृत याबाबत निर्णय घेवून त्यानुसार कर निर्धारण करणे आवश्यक आहे असा अभिप्राय दिलेला आहे.

ड) सबब, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५२ नुसार स्थायी समितीच्या मंजुरीने महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्रमांक ४०सीओ००९०१५२०० ही दुबार नोंद रदद करुन त्यापोटी आकारण्यात आलेला मालमत्ता कर रक्कम रुपये १,२४, ९२६/- + विलंब शास्ती निर्लेखित करणे कामी मंजुरी मिळावी.

इ) परंतु दिनांक ०४ एप्रिल २०२२ रोजी महापालिकेची मुदत संपुष्टात आली आहे. दि. ०३ मार्च २०२२ रोजीचे आदेशान्वये महापालिका प्रशासक म्हणून मा. आयुक्त् यांना नियुक्त् केलेले आहे. स्थायी समिती /महासभेचे सर्व अधिकार मा. आयुक्त् तथा प्रशासक यांना प्राप्त् झालेले आहेत.

ई) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४५२(अ) नुसार दिनांक १२/०७/२०२२ अन्वये प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांना प्राप्त् झालेल्या अधिकारानुसार महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता ४०सीओ००९०१५२०० ही दुबार नोंद रदद करुन त्यापोटी आकारण्यात आलेला मालमत्ता कर रक्कम रुपये १,२४,९२६/- + विलंब शास्ती महाराष्ट्र अधिनियम १९४९ मधील कलम १५२ अन्वये निर्लेखित करणेकरिता प्रशासकीय ठराव क्रमांक १४२ दिनांक १५/०३/२०२४ मंजुर करण्यात आला आहे.

यास्त्व मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश्**

आक्षेप मान्य्

१. प्रशासक तथा आयुक्त् उल्हासनगर महानगरपालिका यांना प्राप्त् झालेल्या अधिकारानुसार महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता ४०सीओ००९०१५२०० ही दुबार नोंद रदद करुन त्यापोटी आकारण्यात आलेला मालमत्ता कर रक्कम रुपये १,२४,९२६/- + विलंब शास्ती महाराष्ट्र अधिनियम १९४९ मधील कलम १५२ अन्वये निर्लेखित करावी.

उप आयुक्त् (कर)
उल्हासनगर महानगरपालिका

आदेश क्रमांक उमपा/करवि/यु06/ 04 /24 दि. 12/04/24

प्रति-

१) श्री. उत्तम फकिरा सगळे, प्रभा निवास, सिताराम नगर, से-३२, उल्हासनगर-४

२) कोल्ब्रो ग्रुप, नागपूर

प्रत- १) मा. आयुक्त् साो, उल्हासनगर महानगरपालिका

२) मुख्य लेखा परिक्षक, उल्हासनगर महानगरपालिका